CIDCO
WE MAKE CITIES

लोकमत

मुंबई, मंगळवार, दि. १७ जून २०२५

# विनापरवाना १११ जाहिरात फलकांवर सिडकोची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** सिडको महामंडळाच्या अखत्यारित येणाऱ्या रस्त्यांच्या दुतर्फा, दुभाजक व विद्युत खांबांवर तसेच विविध प्रयोजनांसाठी आरक्षित ठेवलेल्या भूखंडांवर लावलेल्या अनधिकृत जाहिरात फलकांवर सिडकोने धडक कारवाई केली. याअंतर्गत आठवडाभरात तब्बल १११ विनापरवाना जाहिरात फलक हटविण्यात आले. सिडकोच्या भूखंडांवर बेकायदेशीर जाहिरात फलक लावले जात असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार गेल्या आठवड्यात पुष्पकनगर व उरण परिसरात ही मोहीम राबविण्यात आली.




**लोकसत्ता** मंगळवार, १७ जून २०२५

# जाहिरात फलकांवर सिडकोची कारवाई

## अनधिकृत १११ फलक उतरवले

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पनवेल** : सिडको महामंडळाने पुष्पक नगर व उलवे परिसरातील रस्त्यांच्या दुतर्फा, दुभाजकांवर आणि विजेच्या खांबांवर लावण्यात आलेले १११ अनधिकृत जाहिरात फलक हटवण्याची कारवाई केली. ही कारवाई मागील पंधरा दिवसांत सिडकोच्या अभियांत्रिकी व अनधिकृत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे केली.

सिडकोने विकसित केलेले आणि अद्यापही विक्री न झालेले भूखंड, तसेच पक्क्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंवर, रस्ते दुभाजकांवर आणि विजेच्या खांबांवर अनधिकृतपणे जाहिरात फलक लावल्यामुळे वसाहतीचे विद्रूपीकरण झाले होते. वाहनचालकांना याचा सर्वाधिक त्रास जाणवत होता. नागरिकांकडून अनेक तक्रारी होत असल्याने सिडकोने मोहीम राबवली.

### नागरिकांना आवाहन

सिडकोच्या क्षेत्रात कुठेही अनधिकृत जाहिरात फलक आढळल्यास नागरिकांनी www. cidco. maharashtra. gov. in या अधिकृत संकेतस्थळावर किंवा संबंधित अभियांत्रिकी व अनधिकृत बांधकाम विभागास कळवावे, असे आवाहन सिडको प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

सकाळ मुंबई, मंगळवार, १७ जून २०२५

# दिशादर्शक फलकावर अतिक्रमण

खारघर, ता. १६ (बातमीदार) : खारघर सेक्टर १२ मधील वसाहती बाहेरून येणाऱ्या नागरिकांना सोसायटी, रो- हाउस तसेच बीयूडीपी सोसायटीत सहज जाता यावे, यासाठी सिडकोने प्रवेशद्वारावर दिशादर्शक फलक लावले आहेत; मात्र या दिशादर्शक फलकावर काहींनी अतिक्रमण करून जाहिराती लावल्या आहेत. विशेष म्हणजे, प्रशासनाकडून डोळेझाक करण्यात येत असल्यामुळे नाराजी पसरली आहे.

खारघर वसाहतीत सिडकोने ४० सेक्टरची निर्मिती केली आहे. त्यात सेक्टर १२ हे खारघर वसाहतीमधील सर्वात मोठे सेक्टर आहे. या सेक्टरमध्ये सिडकोने अल्प उत्पन्न गटासाठी बीयूडीपी योजनेअंतर्गत दहा हजारांहून अधिक घरे उपलब्ध करून दिली आहेत. ए, बी, सी, डी अशा इंग्रजी मुळाक्षरानुसार सोसायटीची निर्मिती करून नावे दिली आहेत. तसेच या सेक्टरमध्ये स्वतंत्र रो- हाउस, शाळा, उद्यान, मैदानाची सोय करण्यात आली आहे. बाहेरून येणाऱ्या नागरिकांना दिलेल्या पत्त्यावर सहज पोहोचता यावे, यासाठी मुख्य रस्त्यावर दिशादर्शक फलक बसविण्यात आले आहेत. या फलकावर ए ते झेडपर्यंत प्लॉट क्रमांक नमूद केले आहेत; मात्र काहींनी या दिशादर्शक फलकावर अतिक्रमण करून जाहिराती केल्या आहेत. विशेष म्हणजे, हे दिशादर्शक फलक मुख्य रस्त्यावर असूनही पालिकेकडून डोळेझाक करण्यात येत आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

नवभारत
मुंबई, मंगलवार 17 जून 2025

# अवैध होर्डिंग पर सिडको की कार्रवाई



नवी मुंबई. नवी मुंबई के सिडको क्षेत्र में आने वाले उल्वे तथा पुष्पक नगर नोड तथा जेएनपीटी मार्ग के डिवाइडर तथा सड़क किनारे अवैध रूप से लगाए गए विज्ञापन होर्डिंग तथा बैनर पोस्टर को निकालने का काम सिडको के अतिक्रमण विभाग द्वारा किया गया. इस बारे में जानकारी देते हुए सिडको अतिक्रमण विभाग के प्रमुख तथा मुख्य सतर्कता अधिकारी सुरेश मेंगड़े ने बताया कि पिछले कुछ समय से उन्हें लगातार इस बात की शिकायत मिल रही थी कि पुष्पक नगर तथा उल्वे के मुख्य मार्गों तथा डिवाइडर के बीच में लगे पेड़ों तथा बिजली के खंभों पर अवैध रूप से विज्ञापन होर्डिंग लगाए गए हैं. पता हो कि विज्ञापन होर्डिंग लगाने से पहले सिडको प्रशासन से अनुमति लेना जरूरी होता है लेकिन इन दोनों नोड में कुछ लोगों ने बिना अनुमति के ही बड़ी बड़ी होर्डिंग लगा दी थी. उल्वे नोड के अंदर आने वाले रास्ते तथा मुख्य चौराहों पर राजनीतिक पार्टी के लोगों द्वारा तथा कुछ दुकानदारों द्वारा भी बड़ी- बड़ी होर्डिंग लगाने का काम किया गया था.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd